# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक २४.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३२,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २३/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २२.१४ लिटर दारू असा एकुण ३४,१५०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जिवे मारण्याचा प्रयत्न करणा—याविरूध्द अपराध दाखल :—**

दिनांक 23/10/2022 रोजी फिर्यादी किसन गंगाधर मोरे व्य. मजुरी रा. सिध्दार्थ नगर औढा ना यांचे फिर्यादी वरून पोस्टे औंढा नागनाथ येथे कलम 307,326,294,323,504,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. 22.10.22 रोजी चे 17:00 वा चे सुमारास औढा ते जिंतुर जाणारे रोडवर मौजे रामेष्वर गावाजवळ रोडवर यातील फिर्यादी व त्यांचा मित्र मो.सा. ने जात असतांना समोरून आरोपीतांनी गाडी जवळ आल्याने तुम्ही गाडी व्यवस्थीत चालवा आम्हाला उडवता का असे फिर्यादी म्हणाला असता आरोपीतांनी संगणमत करून अष्लील भाषेत षिवीगाळ करून थापडबुक्यांनी मारहाण करून आरोपीने कंबरेचा चाकु काढुन फिर्यादीचे पोटात जिवे मारण्याच्या उद्देषाने मारून गंभीर जख्मी केले व हातातील चाकुन फिर्यादीचे डोक्यात डाव्या चाळयावर मारून गंभीर जख्मी केल म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात औंढा नागनाथ पोलीस तपास करित आहेत.